# अभ्युदय नगर
## सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)

(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६–२००७)

कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई – ४०० ०३३.

जा. क्र. : १११ / २०१६ - १७ दिनांक :०९.०९.२०१६

प्रति,

**मा. अध्यक्ष / सचिव**

अभ्युदयनगर ______________________ सह.गृह.संस्थांचा संघ मर्या.,

इमारत क्र. ............

**महोदय / महोदया,**

अभ्युदयनगर वसाहतीमधील ४७ सभासद गृहनिर्माण संस्थांमधील बहुसंख्य संस्थांनी ७९(अ) अन्वये विकासक निवड प्रक्रिया पूर्णत्वास नेली आहे. सभासद गृहनिर्माण संस्थांनी घेतलेल्या निर्णयास व निविदेतील प्रक्रियेला अधीन राहून संघ उपविधीतील तरतूदीनुसार संघाने मे.किस्टोन रिॲल्टर्स प्रा.लि. (रुस्तमजी ग्रुप) यांना अंतिम विकासक म्हणून दिनांक ०६.०७.२०१६ रोजी निविदा बहाल केली असून आपणास यापूर्वीच अवगत केलेलेच आहे. त्या अनुषंगाने विकासक मे.किस्टोन रिॲल्टर्स प्रा.लि. यांना संघामार्फत सुधारीत पुनर्प्रस्ताव देण्याबाबत पत्र देण्यात आले होते. त्यानुसार त्यांचा सुधारित पुनर्प्रस्ताव दिनांक २६.०८.२०१६ रोजी संघास प्राप्त झालेला आहे.

दिनांक ३१.०८.२०१६ रोजी संघाच्या व्यवस्थापन समितीची बैठक पार पडली व सदर बैठकीत विकासकाकडून प्राप्त झालेल्या सुधारित पुनर्प्रस्तावावर चर्चा विनिमय होऊन असा निर्णय घेण्यात आला की, प्राप्त झालेल्या सुधारित पुनर्प्रस्तावावर विधीतज्ञ व वास्तुविशारद यांचे समवेत बैठक आयोजित करुन तांत्रिक व कायदेशीर बाबी तपासून घेण्याचे ठरले व त्याप्रमाणे दिनांक ०८.०९.२०१६ रोजी संघाचे विधितज्ञ श्री. आप्पासाहेब देसाई व वास्तुविशारद श्री. अशोक लेले व सौ. प्रिती दळवी यांचे समवेत विस्तृत चर्चा झाली.

सदर बैठकीत निर्णय झाल्याप्रमाणे विकासकाकडून प्राप्त झालेला सुधारित पुनर्प्रस्ताव आपल्या अवलोकनार्थ सोबत पाठविण्यात येत आहे.

अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकासाची निविदा दिनांक ०६.०७.२०१६ रोजी मे.किस्टोन रिॲल्टर्स प्रा.लि. या विकासकास बहाल केल्यापासून ते सुधारित पुनर्प्रस्ताव प्राप्त होईपर्यंतची वेगवेगळ्या घटनासहीतची माहिती संघामार्फत अभ्युदयनगर रहिवाशी बंधू भगिनींना जावक पत्र क्र. ११० / २०१६ - १७ दिनांक ०८.०९.२०१६ अन्वये पाठविण्यात आलेली आहेत. त्याची प्रत आपल्या अवलोकनार्थ सोबत जोडलेली आहे.

संघाची सभासद गृहनिर्माण संस्था म्हणून अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकास प्रक्रियेमध्ये आपले सहकार्य मिळत आहे. त्याअनुषंगाने मे.किस्टोन रिअॅल्टर्स प्रा.लि. (रुस्तमजी ग्रुप) या विकासकाकडून प्राप्त झालेल्या सुधारित पुनर्प्रस्तावाच्या अनुषंगाने आपल्या लेखी सुचना हे पत्र मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत संघाच्या कार्यालयात पोच कराव्यात, जेणेकरुन अभ्युदयनगरच्या एकत्रित पुनर्विकाससंबंधीपुढील वाटचाल करणे सोयीस्कर होईल ही नम्र विनंती.

**अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघावतीने**

**( नंदकुमार मा. काटकर )**
**अध्यक्ष**

**( जयसिंग शि. भोसले )**
**सरचिटणीस**